MHRG020000902007

नियमित दिवाणी दावा क्र.३०/२००७
निशाणी क्र. ११७/ड

**निशाणी ११७ आदेश**
**(पारित दिनांक ०५/०१/२०२२)**

१. वादीने दावा दुरुस्तीसाठी हा अर्ज दिला आहे. अर्जातील हकीकत अशी की, वादीने मालकी हक्काची घोषणा तसेच मनाईसाठी मुळ दावा केला आहे. वादीने सन २००७ मध्ये जेव्हा दावा दाखल केला त्यावेळी त्यांनी प्रतिवादींनी दावा मिळकतीचा वीस वर्षाचा कुळकरार करुन द्यावा अशी मागणी केली होती. दरम्यान केंद्र सरकारने दि. ०९/१०/२०१३ रोजी ठराव केला व मिठासाठी कुळकराराचे नुतनीकरण करता येणार नाही असे जाहिर केले. त्यामुळे वादीला दाव्यातील मागणी दुरुस्त करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादींनी दावा मिळकतीचा कब्जा वादीला द्यावा अशी दुरुस्ती वादीने मागितली आहे. तसेच त्या अनुशंगाने झालेले ठराव दाव्यात समाविष्ट करावेत अशी दुरुस्ती मागितली आहे. तसेच दावा मिळकतीच्या मुल्यांकनात व न्यायालयीन शुल्कातही दुरुस्ती मागितली आहे.

२. प्रतिवादी क्र. १ व २अ ते २क यांनी नि. १२२ कडे म्हणणे देवून अर्जास हरकत घेतली आहे की, मुळ दाव्यामध्ये केलेल्या मागण्या व कथनांशी विसंगत दुरुस्ती वादीने मागितली आहे. संभाव्य दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात अमुलाग्र बदल होणार आहे. संभाव्य दुरुस्ती मुदतबाहय

आहे. ज्या कारणावरुन मिळकतीचा ताबा मागितला आहे, ते कारण नवीन दुरुस्तीप्रमाणे मुदतबाहय आहे. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा अशी प्रतिवादींची मागणी आहे.

३. दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकले.

४. संभाव्य दुरुस्तीद्वारे वादीने दावा मिळकतीचा कब्जा मागितला आहे. प्रतिवादीच्या कथनानुसार सदरची मागणी मुदतबाहय आहे. परंतु जोपर्यंत दुरुस्ती मंजूर होत नाही तोपर्यंत मागणी मुदतबाहय आहे किंवा नाही हे ठरणार नाही. त्यासाठी तशी दुरुस्ती होणे आवश्यक आहे. मागणी मुदतबाहय आहे म्हणून दुरुस्ती नाकारता येणार नाही. प्रतिवादींना दुरुस्ती दाव्यास कैफियत देण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे संभाव्य दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे नुकसान होणार नाही. वादीच्या कथनानुसार केंद्रशासनाचा ठराव १२/०९/२०१९ रोजी अंतिम झाला आहे. त्यानंतर सहा महिन्यात वादीने हा अर्ज दिला आहे. अद्याप दाव्याची चौकशी सुरु झालेली नाही. या सर्व कारणांसाठी अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब आदेश.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. या आदेशापासून १४ दिवसाच्या आत वादीने दुरुस्ती करावी, नवीन प्रती दयाव्यात व योग्य तो न्यायालयीन शुल्क दयावा.

सही/-

अलिबाग (अमोल अ. शिंदे)

दिनांकः- ०५.०१.२०२२ २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,

अलिबाग-रायगड

......